**प्रेसनोट** **तारीख १६/०३/२०१९**

## शिवाजीनगर पोलीस ठाणे,पुणे शहर

## तडीपार इसमाविरूध्द करण्यात आली कारवाई

दि.१३/०३/२०१९ रोजी सायं १७.०० वा ते २१.०० वा.चे दरम्यांन पोलीस उप निरीक्षक संदिप चव्हाण पो.शि ढमढेरे,पो.शि कांबळे असे शिवाजीनगर पोलीस ठाणेचे हद्दीमध्ये पेट्रोलिंग करीत असताना पो.शि ठाकरे यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की,फरासखाना पोलीस ठाणे येथून तडीपार करण्याතत आलेला आरोपी नामें सुरज ऊर्फ गणेश अशोक वडडू ऊर्फ गावठी गण्या रा.मंगळवार पेठ,पुणे हा कामगार पुतळा शिवाजीनगर पुणे येथे आला असून त्यांचे जवळ लोखंडी कोयता असलेबाबत बातमी मिळाली.

पो.शि ठाकरे यांना मिळालेल्या बातमीचे अनुषंगाने पोलीस उप निरीक्षक चव्हाण व त्यांचे सोबत पोलीस स्टाफ असे कामगार पुतळा शिवाजीनगर पुणे येथे गेले असता तेथे साई मंदिराजवळ तडीपार करण्यात आलेला गावठी गण्या उभ्या असल्याचे दिसल्याने त्यांस पोलीस उप निरीक्षक चव्हाण यांनी सोबत असलेल्या पोलीस स्टाफचे मदतीने ताब्यांत घेऊन त्यांचा नाव पत्ता विचारला असता त्याने त्यांचे नांव सुरज ऊर्फ गणेश अशोक वडडु ऊर्फ गावठी गण्या वय २३ वर्षे रा.२२८ मंगळवार पेठ,पुणे व मुळगांव मु.पो-कुर्र ता.भुदरगड जि.कोल्हापूर असे असल्याचे सांगितले.

ताब्यांत घेण्यांत आलेला तडीपार आरोपी नामें सुरज ऊर्फ गणेश अशोक वडडु ऊर्फ गावठी गण्या यांस कधी तडीपार करण्यात आलेले आहे याबाबत फरासखाना पोलीस ठाणे येथे संपर्क साधून माहिती घेतली असता सदरचा आरोपी यांस मा.पोलीस उप आयुक्त सो,परि-१ पुणे् शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक -०८/२०१९ दि.०६/०२/२०१९ अन्वये पुणे शहर पोलीस आयुक्तालय व पुणे ग्रामीण जिल्हयाचे हद्दीतून ०१ वर्षाकरिता तडीपार करण्यात आले असल्याबाबत माहिती मिळाल्याने त्यांस पुणे शहरामध्ये येण्याकरिता शासनाची अगर मा.पोलीस उप आयुक्त सो,परि-१ पुणे शहर यांची परवानगी घेतलेली आहे अगर कसे याबाबत विचारणा केली असता त्याने परवानगी घेतलेली नसल्याचे सांगितल्याने त्यांची बरोबर असलेल्या स्टाफकरवी अंगझडती घेतली असता त्याचेकडे एक लोखंडी कोयता मिळून आल्याने तो ताब्यांत घेऊन त्यांचेविरूध्द शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नंबर महा.पो.का.कलम १४२,३७ (१)(३)सह १३५ व आर्म्स ॲक्ट कलम ४(२५)प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

वरील नमुद कारवाई ही बाळासाहेब कोपनर वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजीनगर पोलीस ठाणे,पुणे ,श्री बापू शिंदे पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली संदिप चव्हाण पोलीस उप निरीक्षक, पो.हवा सुनिल वाघवले ,पो.शि मल्हारी ढमढेरे ,पो.शि दिपक कांबळे ,पो.शि ठाकरे,पो.शि शिरकांडे व पो.शि रासकर यांनी केलेली आहे.

( बाळासाहेब कोपनर )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
शिवाजीनगर पोलीस ठाणे,पुणे शहर